महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व तांत्रिक अधिकारी यांची कार्यकक्षा निश्चित करण्याबाबत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन, महाराष्ट्र
परिपत्रक क्रमांक: मगांराग्रारोहयो सोसायटी/एच.आर./०१/२०१३
दिनांक : २४ मे, २०१३

वाचा: १. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.७/रोहयो १०अ, दि. १६/१२/२०१०
२. शासन निर्णय क्र. क्र. मग्रारोहयो २०११/प्र.क्र.५४/रोहयो १०अ, दि. २७/०५/२०११

## परिपत्रक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची राज्यामध्ये प्रभावीरितीने अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यास केंद्र शासनाने मुभा दिली आहे. त्या अनुषंगाने राज्य स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन, महाराष्ट्र या सोसायटीमार्फत सर्व जिल्हयांमध्ये कार्यक्रम व्यवस्थापक (Programme Manager), सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (Assistant Programme Officer ) व तांत्रिक अधिकारी (Technical Officer) यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. याकरिता विशिष्ट शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारांची चाचणी घेऊन गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करुन त्यांना नियुक्त करण्यात आले आहे.

२. या तांत्रिक कर्मचारी वर्गाच्या सेवा प्राप्त करुन घेताना त्यांना नेमून द्यावयाच्या कामांबाबत व त्यांच्या कार्यकक्षा निश्चित करण्याबाबत सोसायटीच्या कार्यकारी मंडळाच्या दि. २५/०३/२०१३ रोजी पार पडलेल्या ७ व्या बैठकीमध्ये सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. त्या अनुषंगाने या कर्मचारी वर्गाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

(अ) **कार्यक्रम व्यवस्थापक (Programme Manager)** :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीच्या कामात जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना मदत करण्यासाठी नियोजन (रोहयो) विभागाच्या

दि. १६/१२/२०१० च्या शासन निर्णयातील तरतुदीच्या आधारे कार्यक्रम व्यवस्थापक या पदांवर सुयोग्य उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. या उमेदवारांच्या नियुक्ती पत्रातील परिच्छेद क्र. (३) येथे नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या सेवांचे पुनर्विलोकन करणे अथवा सेवेच्या स्वरुपात सुधारणा करण्याबाबत प्राप्त परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचे अधिकार सोसायटीला आहेत. त्यानुसार सध्या तालुका अथवा गट स्तरावर कार्यरत असलेले सर्व कार्यक्रम व्यवस्थापक यांच्या सेवा, या उमेदवारांची उच्च शैक्षणिक अर्हता व पूर्वानुभव विचारात घेता जिल्हा स्तरावरील कामांकरिता उपलब्ध करुन देण्याचा निर्णय सोसायटीने घेतला आहे. यास्तव, कार्यक्रम व्यवस्थापक यांच्यावर नरेगाच्या अंमलबजावणी सोबतच खालील कामांची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

१. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्या कार्यालयामध्ये E-Muster, E-FMS, नमुना क्र. १ चे अद्ययावतीकरण, नवीन जॉब कार्ड वितरण, अपूर्ण कामे पूर्ण करणे व अनुषंगिक बाबी यांचे जिल्हा स्तरावर संनियंत्रण करणे.
२. उपरोक्त कामे पार पाडतांना सर्व संबंधित अंमलबजावणी यंत्रणांमध्ये समन्वय ठेवणे.
३. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले विशेष कृती कार्यक्रम, धडक मोहिम (Special Drive), सामाजिक अंकेक्षण व विविध उपक्रम याद्वारे निर्देशित कामे विहित कालावधीत पार पाडणे.

उपरोक्त जबाबदारी पार पाडण्यासाठी सर्व संबंधित कार्यक्रम व्यवस्थापक यांचे या परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये लेखा संमती पत्र, संबंधित उप जिल्हाधिकारी (रोहयो) यांनी प्राप्त करुन सोसायटीच्या नागपूर येथील कार्यालयास पाठविणे अनिवार्य आहे. तसेच, कार्यक्रम व्यवस्थापकांना त्यांची कर्तव्ये पार पाडणे सुलभ व्हावे या दृष्टीने त्यांच्या सोईनुसार त्यांची नियुक्ती शक्यतो त्यांच्या मूळ महसूली विभागामध्ये अथवा अपवादात्मक परिस्थितीत नजीकच्या महसूली विभागामध्येच करण्यात यावी.

ज्या कार्यकम व्यवस्थापकांची उपरोक्त कामे पार पाडण्यास इच्छुकता नाही, त्यांना सोसायटीच्या कामात स्वारस्य नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**(ब) सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (Assistant Programme Officer)** :- नियोजन (रोहयो) विभागाच्या दि. १६/१२/२०१० च्या शासन निर्णयान्वये सहाय्यक कार्यक्रम अधिकारी या पदाची कर्तव्ये निश्चित करण्यात आली आहेत. पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी

यांना मदत करण्यासाठी तसेच, यंत्रणा व पंचायत समिती यांच्यामध्ये समन्वय ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. प्रथमत: ज्या तालुक्यांमध्ये कामांची व्याप्ती जास्त आहे अशा ठिकाणी प्राथम्याने सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांच्या सेवा सोसायटीमार्फत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची व्याप्ती ज्या जिल्हयांमध्ये सतत वाढत आहे, अशा ठिकाणी योजनेचे लेखाविषयक कामकाज हाताळण्यासाठी कंत्राटी तत्वावरील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन देण्याची मागणी सोसायटीकडे करण्यात येत आहे. ही बाब विचारात घेता, ज्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची शैक्षणिक अर्हता ही वाणिज्य शाखा पदवीधर अथवा तत्सम आहे, त्यांच्यावर पंचायत समिती स्तरावर योजनेचे लेखाविषयक कामकाज हाताळणारे संबंधित सहाय्यक लेखा अधिकारी यांना मदत करण्याची जबाबदारी या आदेशान्वये सोपविण्यात येत आहे. मात्र, लेखाविषयक कामकाजाची अंतिम जबाबदारी सहाय्यक लेखा अधिकारी यांची असल्याने धनादेश, लेखापुस्तके, कॅश बुक इत्यादी अभिलेख्यांवर स्वाक्षरी करणे अथवा प्रमाणित करणे ही जबाबदारी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येऊ नये. हया बाबी सहाय्यक लेखा अधिकारी यांनी प्रचलित नियमानुसार हाताळाव्या. याबाबत संबंधित सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (लेखा) या पदनामाने करण्यात येऊन तसे सुस्पष्ट आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी निर्गमित करावे.

**(क) तांत्रिक अधिकारी :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्राम पंचायतींमार्फत केल्या जाणाऱ्या कामांची अंमलबजावणी करतांना तांत्रिक बाबींमध्ये मदत करण्यासाठी दि. १६/१२/२०१० च्या शासन निर्णयान्वये तांत्रिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. या अधिकाऱ्यांची कर्तव्ये सदर शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे यंत्रणांमार्फत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये तांत्रिक अधिकाऱ्यांची भूमिका या विभागाच्या दि. २७/०५/२०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त तालुका स्तरावर NREGA Soft संगणक प्रणालीच्या अहवालानुसार E-Muster's संनियंत्रण करणे, त्याचे मोजमाप नोंदविणे, मुल्यनिर्धारण करणे, Muster Tracker चा आढावा घेणे व अनुषंगिक बाबींची जबाबदारी तांत्रिक अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे.

३. **प्रवास भत्ता व दैनिक भत्ता :-** कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व तांत्रिक अधिकारी यांना मानधन व अनुज्ञेय प्रवास भत्ता यांचे प्रदान जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेले सोसायटीच्या ६% प्रशासकीय निधीच्या खात्यामधील निधीतून करण्यात यावे. याकरिता सोसायटीमार्फत सर्व जिल्हयांना निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

Smita 587

उपरोक्त कर्मचाऱ्यांपैकी कार्यक्रम व्यवस्थापक यांना दि. २१/०८/२०१२ च्या शासन ॉयान्वये MIS Co-ordinator यांना देय असलेल्या दराने प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय इल.

सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व तांत्रिक अधिकारी यांना दि. २१/०८/२०१२ च्या शासन ॉयातील तरतुदीनुसार प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल.

(एम. संकरनारायण)
उपाध्यक्ष,
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी
योजना राज्य निधी असोसिएशन, महाराष्ट्र

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. मा. प्रधान सचिव (रोहयो), रोजगार हमी योजना विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४. सर्व उपायुक्त (रोहयो)

**(सद्यस्थितीत तालुका स्तरावर कार्यरत कार्यक्रम व्यवस्थापकांकडून घ्यावयाचे)**

# संमतीपत्र

कार्यक्रम व्यवस्थापकाचे पूर्ण नाव :------------------------------------------------------------------------

मो. क्र.:- ---------------------------------- E-mail id :- ---------------------------------------------

सध्या कार्यरत ठिकाण (तालुका) :- ------------------------- जिल्हा:- ----------------------------------------

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन (MGNREGSSFA-M) महाराष्ट्र, यांचे वतीने मी सध्या वर दर्शविलेल्या तालुक्यात कार्यरत असून राज्य सोसायटीने दि. २५/०३/२०१३ च्या सातव्या बैठकीत ठरविल्यानुसार ------------------ जिल्हयाच्या मुख्यालयी काम करण्यास माझी संमती आहे. यामुळे माझ्या मानधनामध्ये कुठलेही बदल होणार नाही याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण : --------------- कार्यक्रम व्यवस्थापकाची स्वाक्षरी :- ----------------------------

दिनांक : ---------------- नांव :- ------------------------------------------------------------

Smita 587